ठाणे महानगरपालिका,ठाणे.

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक १०.०८.२०१०.

ठाणे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सूचना,
सभा सूचना क्रमांक ४, दिनांक १०.०८.२०१०.

प्रती,
सन्मा.श्री./श्रीमती..............................
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

या सूचनेव्दारे आपणास कळविण्यांत येते की,ठाणे महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा शुक्रवार दि.२०/०८/२०१० रोजी सकाळी ठिक ११.३० वाजता, ठाणे महानगरपालिकेच्या "भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहांत " सभा सूचना क्रमांक ४ दि.१०.०८.२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचारविनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत आली आहे.

तरी सदर सभेस आपण कृपया उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.महापौर महोदय याचे मंजुरीने........

( सौ.छाया प्र.मानकर)
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

सभा सूचना क्र.४ दि. १०.०८.२०१० ची विषयपत्रिका.

प्रश्नोत्तरे

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| ९८ | ठाणे महानगपालिकेच्या दि.२३.३.२०१०, दि.२६.३.२०१०, दि.३०.३.२०१०,दि.२०.४.२०१०,दि.१८.६.२०१०, दि.२३.६.२०१० व दि.१६.७.२०१० रोजीच्या मा.सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत वाचून कायम करणेबाबत. |
| ९९ | ठाणे महानगरपालिकेच्या मा.महिला बालकल्याण समिती,मा.क्रीडा समाजकल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समिती,मा.आरोग्य परिरक्षण व वैद्यकिय सहाय्य समिती,मा.गलिच्छ वस्ती निमुर्लन समिती,व मा.माध्यमिक व पुर्वप्राथमिक शिक्षण समितीचे दि. १५ जुलै २००९ रोजीचे इतिवृत्त वाचून कायम करणेबाबत. |
| १०० | श्री.बालाजी खतगांवकर मुख्य अधिकारी श्रेणी-१ यांची ठाणे महापालिकेच्या उपआयुक्त या पदावर पूढील एक वर्षाच्या मुदतवाढीस मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत. |
| १०१ | श्री.स.की.उबाळे यांना ठा.म.पा.च्या आस्थापनेवर मुख्य लेखा परिक्षक या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्तीच्या प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत. |
| १०२ | श्रीमती स्वाती बळवंतराव देशपांडे यांची ठाणे महापालिकेच्या सहा.आयुक्त या पदावर प्रतिनियुक्तीने पदस्थापना करणेबाबत. |

१०३ श्रीमती हेमलता पुंडलिक उगळे यांची ठाणे महापालिकेच्या सहा.आयुक्त या पदावर प्रतिनियुक्तीने पदस्थापना करणेबाबत.

१०४ श्रीमती प्रज्ञा शंकरराव पोतदार यांची ठाणे महापालिकेच्या सहा.आयुक्त या पदावर प्रतिनियुक्तीने पदस्थापना करणेबाबत.

१०५ श्री. मच्छिंद्र मारुती घोलप यांची ठाणे महापालिकेच्या सहा.आयुक्त या पदावर प्रतिनियुक्तीने पदस्थापना करणेबाबत.

१०६ श्रीमती गुळवे वंदना मणिराम यांची ठाणे महापालिकेच्या सहा.आयुक्त या पदावर प्रतिनियुक्तीने पदस्थापना करणेबाबत.

१०७ श्री.बी.जी.पवार उपआयुक्त अतिक्रमण यांचे प्रतिनियुक्तीवरील नियुक्तीस मुदतवाढ मिळणेबाबत.(दि.२०.०७.२०१० रोजीच्या सभेतील तहकूब प्रकरण.)

१०८ श्री.अरविंद आकाशी- सहाय्यक आयुक्त यांचे प्रतिनियुक्तीवरील नियुक्तीस मुदतवाढ मिळणेबाबत.(दि.२०.०७.२०१० रोजीच्या सभेतील तहकूब प्रकरण.)

१०९ श्री.सु.च.हजारे सहाय्यक संचालक नगररचनाकार हयांची ठाणे महानगरपालिका सहा.संचालक नगररचनाकार या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करणेबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे सादर. (दि.२०.०७.२०१० रोजीच्या सभेतील तहकूब प्रकरण.)

११० प्रभाग अधिकारी (विभाग अधिकारी) व उपप्रभाग अधिकारी (उपविभाग अधिकारी )प्रभाग कार्यालय यांचे पदनाम कार्यालयीन अधिक्षक व कार्यालयीन उपअधिक्षक प्रभाग कार्यालय असे करणेबाबत.

१११ ठाणे महापालिकेच्या जकात विभागाकडील मार्गस्थ दाखला पावती पुस्तके व झेरॉक्स पेपरची रद्दी विक्री करणेबाबत., मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेसाठी सादर.

११२ पोखरण रोड क्र.१ ते नितिन कंपनी जंक्शनपर्यंत ५०० मी.मी.व्यासाची डी.आय.के-९ ग्रेड जलवाहिनी टाकणेबाबत मा.सर्वसाधारण सभेच्या प्रशासकीय व वित्तिय मान्यतेसाठी सादर.

११३ ठाणे शहरातील मुंबई मनपाची नळसंयोजने बंद करुन टेमघर जलशुध्दीकरण केंद्र येथे एकत्रित ४० द.ल.लि.पाणी पुरवठयासाठी बृहन्मुंबई मनपाच्या तानसा मेनवर कनेक्शन घेणेबाबत मा.सर्वसाधारण सभेच्या प्रशासकीय व वित्तिय मान्यतेसाठी सादर.

११४ घोडबंदर रोड सर्व्हीस रस्त्याचे सिनेवंडर मॉल ते पातलीपाडा दरम्यान बांधकाम करणेबाबत येणा-या खर्चास मा.सर्वसाधारण सभेच्या प्रशासकीय व वित्तिय मान्यतेसाठी सादर.

११५ अंबिकानगर न.२ येथील रस्त्याचे रुंदीकरण व सिमेंट काँक्रिटीकरण करणेबाबत मा.सर्वसाधारण सभेच्या धोरणात्मक निर्णयासाठी सादर.

११६ पूर्व द्रुतगती महामार्गावरील तीन हात नाका येथील वाहतुक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी एस. व यु. आकाराचे उड्डाणपुल बांधणेबाबत येणा-या खर्चास मा.सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळणेबाबत.

११७ ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील जुन्या मुंबई -पुणे रस्त्यावर तीन ठिकाणी उड्डाण पुल बांधणेबाबत येणा-या खर्चास मा.सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळणेबाबत.

(सौ.छाया प्र. मानकर.)
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

महापालिका सचिव कार्यालय,
ठाणे महानगरपालिका,ठाणे
दिनांक १०.०८.२०१०.

महापालिका सचिव कार्यालय,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.
दिनांक: १०.०८.२०१०

ठाणे महानगरपालिका सभा सूचना क्रमांक ४ दिनांक १०.०८.२०१० अन्वये,शुक्रवार दिनांक : २०.०८.२०१० रोजीच्या मा.सर्वसाधारण सभेसाठी सन्मा.सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची यादी खालीलप्रमाणे,

<u>प्रश्न क्रमांक १ :</u>

सन्मा.सदस्य सौ.प्रमिला मुकूंद केणी यांनी दि.०५.०७ २०१० रोजीच्या पत्रान्वये विचारलेले प्रश्न खालीलप्रमाणे,

१. माहिती व जनसंपर्क विभागामध्ये कोणकोणत्या अंदाजपत्रकीय लेखाशिर्षकाअंतर्गत निधी देण्यांत येतो?

२. प्रत्येक लेखाशिर्षकाअंतर्गत किती निधी दिला जातो?

३. महापालिकेचे उद्घाटनाचे कार्यक्रम कोणत्या विभागामार्फत राबविले जातात?त्यासाठी खर्चाची तरतूद करण्यांत आलेली आहे कां? व किती ?

४. माहिती व जनसंपर्क विभागाचे कामाचे स्वरुप नक्की कांय आहे ?

५. महापालिकेच्या कार्यक्रमासाठी येणा-या मंत्री महोदय,खासदार, आमदार यांचे स्वागत व पाहुणचार याची जबाबदारी कोणत्या विभागाची असते?

<u>प्रश्न क्रमांक २ :</u>

सन्मा.सदस्य श्री.दशरथ बा.पालांडे यांनी दि.१४.०७ २०१० रोजीच्या पत्रान्वये विचारलेले प्रश्न खालीलप्रमाणे,

१. महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये किती उदयाने आहेत ? त्यापैकी किती उदयानांची देखरेख महापालिकेच्या माध्यमातून केली जाते व किती उदयानांची देखरेखीची कामे इतर संस्थांकडून केली जातात?

२. उदयान विभागामध्ये किती अधिकारी व कर्मचारी उपलब्ध आहेत ? त्यामध्ये पुरुष व स्त्री अशी वर्गवारी करुन त्यांचा कामाचे स्वरुप व त्यांचेवर जबाबदारी निश्चित करण्यांत आली आहे? कोणते कर्मचारी कोणत्या ठिकाणी काम करतात याच प्रभाग समितीनिहाय नावासह माहिती मिळावी.

३. उदयान विभाग व वृक्ष प्राधिकरण अशी वेगवेगळी दोन खाती आहेत कां?वृक्ष प्राधिकरण विभागामध्ये काम करणा-या अधिकारी व कर्मचारी यांची नावासह व त्यांचेवर निश्चित केलेल्या जबाबदारीसह संपूर्ण माहिती उपलब्ध दयावी.

४. उदयान व वृक्ष विभागामध्ये अधिकारी व कर्मचारी यांचे व्यतिरिक्त इतर संस्थांकडून कोणकोणती कामे केली जातात?

प्रश्न क्रमांक ३ :

सन्मा.सदस्य ॲडअनिता सुनिल गौरी यांनी दि.१५.०७ २०१० रोजीच्या पत्रान्वये विचारलेले प्रश्न खालीलप्रमाणे,

१. मुंबई-नाशिक रोडवर ठाणे महानगरपालिका हद्दीत येत असलेल्या लोढा पॅराडाईज समोरील बाजुस रुस्तमजी नामक कॉस्ट्रल कन्स्ट्रक्शन व्यक्तीचे बांधकाम चालू करण्यांत येणार व सध्यस्थिती तेथे भरणीचे काम चालू आहे अशा परिस्थितीत मुंबई-नाशिक रोडला जोडणारा रस्ता संबंधित विकासकाने तयार केला आहे.याठिकाणी सदरहू रस्ता तयार करण्यासाठी कोणत्या नियमानुसार परवानगी देण्यांत आलेली आहे व कोणी दिली ? याची सविस्तर माहिती मिळावी.

२. सदरहू रस्त्यासाठी परवानगी अर्ज कोणी कले? व कधी केले ? व परवानगी कधी मिळाली?

३. व सदर रस्त्यासाठी येणारा खर्च कोणी केला ?

४. सदर रस्त्याची परवानगी ठाणे महानगरपालिकेने दिली कां? हा रस्ता अधिकृत आहे की अनधिकृत?

५. त्याचप्रमाणे मुंबई-नाशिक हायवे वरिल खारीगांव येथील जोडरस्ता कां होत नाही? माहिती मिळावी. परवानगीसाठी अर्ज २००७ साली केला आहे. सदर रस्त्यासाठी किती वर्षे लागतील?

प्रश्न क्रमांक ४ :

सन्मा.सदस्य श्री.प्रकाश हरिश्चंद्र राऊत यांनी दि.३०.०७ २०१० रोजीच्या पत्रान्वये विचारलेले प्रश्न खालीलप्रमाणे,

१. ठाणे पुर्व विभागांत कोपरी पोलिस स्टेशन समोर माया नगरच्या जागेत असलेली गणेशकृपा इमारतीत तळमजल्यावर रुम नं.७ येथील निवासी ठिकाणी शुभांगी नागरी पतपेढी चालू आहे या पतपेढीस महापालिकेने अथवा अन्य संस्थेकडून परवानगी दिली आहे किंवा कसे ? नसल्यास यावर प्रशासनाने काय कारवाई केली?

२. गणेशकृपा इमारतीत लोकमान्य टिळक पथावर मस्तान नगरमधील रस्तारुंदीमधील विस्थापित वास्तव्य करीत आहेत कांय? पालिकेकडून विस्थापितांना काय मोबदला दिला ?

३. गणेशकृपा इमारतीत सन २००५ साली अनधिकृत बांधकाम म्हणून कर आकारणी निवासी करीता केली असता सन २०१० साली तळमजल्यावरील रुम क्र. ७ ला घाईगर्दीने बिगर निवासी कर आकारणी केली आहे कां? असल्यास कोणत्या नियमानुसार ?

४. प्रकरणी प्रशासनाने एमआरटीपी अंतर्गत कारवाई केली आहे कां?

५. वरीलप्रमाणे अनधिकृत बांधकाम निवासी ऐवजी बिगर निवासी करणेस प्रशासकीय अधिका-यांचा हात आहे कां, असल्यास याला जबाबदार कोण व त्या अधिका-यांवर फौजदारी गुन्हे प्रशासनाने दाखल केले आहेत कां?

<u>प्रश्न क्रमांक ५ :</u>

सन्मा.सदस्य श्री.सुधीर प्रल्हाद बर्गे यांनी दि.३०.०७ २०१० रोजीच्या पत्रान्वये विचारलेले प्रश्न खालीलप्रमाणे,

१. ठाणे महानगरपालिकेचा उपवन तलाव व त्याशेजारी असलेला परिसर बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर दिलेल्या संस्थेचे नांव? सदर संस्थेला हा प्रकल्प किती वर्षाकरीता देण्याचा करार करण्यांत आला आहे त्या करारनाम्यात देण्यात आलेल्या अटी व शर्ती कोणत्या?

२. सदर प्रकल्पाचा नकाशा तयार करण्यांत आला आहे कां? त्या नकाशामध्ये जागेवर कोणकोणत्या कामांचे नियोजन करण्यांत आले आहे व का व त्या नकाशास महापालिकेची मंजुरी घेण्यात आली आहे कां? त्या नकाशा करारनाम्याची साक्षांकित प्रत देण्यांत यावी. त्याकरीता येणारे शुल्क भरण्यास मी तयार आहे.

३. ठाणे महानगरपालिकेच्या उपवन येथील उपहारगृह कोणत्या संस्थेला चालविण्यास देण्यांत आलेले आहे त्या संस्थेचे नांव? त्या संस्थेला किती वर्षाकरीता हे उपहारगृह चालविण्यास देण्याचा करारनामा करण्यांत आलेला आहे? सदर उपहारगृहाचे बाजारभावाप्रमाणे मासिक भाडे किती आहे? आज दिलेल्या संस्थेकडून मासिक भाडयापोटी किती रक्कम मिळत आहे?

४. सदर उपहारगृह चालविण्याकरीता आजपर्यंत निविदा मागविण्यांत आल्या होत्या कां? त्यावेळी किती संस्थांनी निविदा भरल्या होत्या त्यांची नांवे ? उपहारगृह चालविण्याकरीता आजपर्यंत कोणत्या संस्थांनी मागणी केली आहे कां? त्यांची नावे व त्या मागणीमध्ये त्यांनी किती भाडे देण्याचे कबूल केले होते, त्यावर आजपर्यंत कोणत्या प्रकारची कार्यवाही करण्यांत आलेली आहे तसेच या उपहारगृहामये मदयपान करण्यास परवानगी आहे कां?

५. ठाणे महानगरपालिकेच्या स्थावर मालमत्ता विभागामार्फत आजपर्यंत कोणकोणत्या वास्तु भाडेतत्वावर देण्यांत आलेल्या आहेत व त्या वास्तू असलेल्या ठिकाणांची नांवे कांय ? त्या वास्तू ज्या संस्था अगर व्यक्तीला देण्यांत आलेल्या आहेत त्यांची नांवे कांय? त्या प्रत्येक वास्तुंचे आजच्या बाजारभावाप्रमाणे भाडे किती? त्या प्रत्येक वास्तु भाडेतत्वावर देताना संबंधितांकडून किती भाडे घेण्याचा करारनामा करण्यांत आला आहे,त्यापोटी आजपर्यंत थकबाकी आहे कां? असल्यास थकबाकीदाकांची नांवे कायं?

<u>प्रश्न क्रमांक ६ :</u>

सन्मा.सदस्य श्री.शैलेश तुकाराम सावंत यांनी दि.३०.०७ २०१० रोजीच्या पत्रान्वये विचारलेले प्रश्न खालीलप्रमाणे,

१. मेंटल हॉस्पिटल परिसरांतील ठामपा शाळा क्र.१८ ची इमारत कोणी व केव्हा बांधली? या इमारतीचे अधिकृत बांधकाम किती आहे?या बांधकामाव्यतिरिक्त इमारतीच्या आवारात सध्या अन्य किती बांधकाम झालेले आहे?ते कोणी केले आहे व ते अधिकृत आहे कां?इमारतीच्या कंपाऊंयडमधील संपूर्ण जागा मुळची कोणाची?आता तिची मालकी महापालिकेकडे आहे कां?

२. शाळेची इमारत ठामपा च्या मालकीची आहे कां? असल्यास इमारतीत शाळेच्या वापराकरीता किती जागा देण्यांत आलेली आहे ? या इमारतीत शाळेच्या वापराव्यतिरिक्त उपलब्ध असलेली जागा त्याठिकाणी असलेल्या संस्थेला भाडयाने दिली आहे कां? त्या संस्थेशी भाडे करारनामा झाले आहे कां? असल्यास किती मुदतीचा ? ठामपा वार्षिक भाडे रक्कम किती आकारते ? सदरहू संस्था किती सालापासून या इमारतीत कारभार चालवित आहे ?

३. त्या वेळेपासून आतापर्यंत किती भाडे रक्कम भरणा त्या संस्थेने ठामपाकडे केली आहे व किती थकबाकी येणे आहे ? भाडे करारनामा केला नसल्यास अशाप्रकारे ठामपा मालमत्ता दुस-यास वापरावयास देता येते का ? त्यासाठी शासनाची परवानगी घेतली आहे कां?

४. सदर इमारत ठामपाच्या मालकीची असल्यास शाळेचे वर्ग इमारतीच्या बाहेरील आवारातल्या वर्गात कां घेतले जात होते व अदयापही वारात असतात. जागेअभावी नागरीकांची मायमिक शिक्षण वर्गाची मागणी का नाकारली जाते?

५. शाळा कंपाऊंडच्या आवारातील पत्र्याच्या शेडचे वर्ग व इतर बांधकाम स्ट्रक्चर्स इतर कोणकोणत्या संस्थेस देण्यांत आले आहेत? असल्यास किती मुदतीकरीता ? त्या त्या संस्थेकडून किती भाडे रक्कम आकारली जाते ? ती नियमित मिळते कां? थकबाकीदार संस्था कोणत्या ? त्यांच्याकडून प्रत्येकी किती थकबाकी येणे आहे ?

<u>प्रश्न क्रमांक ७ :</u>

सन्मा.सदस्य श्री.महेंद्र कोमुर्लेकर यांनी दि.३०.०७ २०१० रोजीच्या पत्रान्वये विचारलेले प्रश्न खालीलप्रमाणे,

१. मुंब्रा पेट्रोलपंप ते कौसा पेट्रोलपंप रस्ता कॉंक्रिटीकरण करण्याचे काम चार वर्षापुर्वी पुर्ण झाले होते,परंतू मुंब्रा टर्नलपासुन मुंब्रा पेट्रोलपंप पर्यंत कॉंक्रिटीकरण करण्याचे काम झालेले नाही त्याचे कारण कांय?तसेच सदरहू निविदा प्रक्रिया ही मुंब्रा टर्नलपासुन मुंब्रा पेट्रोलपंप पर्यंतची पुर्ण करण्यांत आलेली आहे कां?निविदा प्रक्रिया पुर्ण झाली असल्यास अदयाप कामास विलंब कां होत आहे ? तसेच सदर ठेकेदारास बिलाची रक्कम पुर्ण रस्त्याची अदा करण्यांत आली आहे कां? तसेच वाऐव मंजुरी सदर निविदेस घेण्यांत आली आहे कां ? तसेच सदर ठेकेदाराने काम अपुर्ण केले असल्यास ठाणे महानगरपालिकेतील आणखी कोणकोणती कामे सदर ठेकेदारास देण्यांत आलेली आहेत कां ?

२. मुंब्रा कौसा विभागामध्ये सिव्हरेज( भुयारी गटार )योजनेची निविदा प्रक्रिया कधी पुर्ण झाली आहे त्याचा कार्यादेश कधी देण्यांत आलेला आहे त्याची तारीख देण्यांत यावी. त्याची काम पुर्ण करण्याची मुदत किती वर्षाची आहे. तसेच पुर्ण विभागामध्ये भुयारी गटार योजना करण्याचा नकाशा तयार करण्यांत आलेला आहे कां ? असल्यास देणेबाबत विनंती.

३. भुयारी गटार योजनेचे काम पुर्ण झाल्यानंतर सदर रस्ता पुर्ववत डांबरीकरण तसेच कॉंक्रिटीकरण करण्याचे काम कोणाचे आहे ? सदर ठेकेदार काम पुर्ण करीत नसेल तर ते काम पुर्ण करण्याची जबाबदारी कोणाची आहे ? तसेच मुंब्रा पेट्रोलपंप ते मुंब्रा टर्नलपर्यंत सिव्हरेजचे काम पुर्ण झालेले असुन तो रस्ता रहदारीसाठी अजून चालू कां करण्यांत आलेला नाही ?

४. रुस्तमजी बिल्डर यांनी सुरु केलेले काम महापालिकेच्या कोणकोणत्या परवानग्या घेऊन केलेले आहे? तसेच महापालिकेच्या जलवाहिन्यावर मोठया प्रमाणांत कॉंक्रिट टाकून स्वत:च्या कॉंप्लेक्समध्ये जाण्यासाठी जोडरस्ता केलेला आहे तो कोणाच्या परवानगीने केलेला आहे ? त्यासाठी महापालिकेची रितसर परवानगी घेताना हायवे ॲथॉरिटीची परवानगी सादर केली आहे कां?

५. तसेच सदर जागेतील मँग्रोजची (खारफुटीची झाडे )मोजणी महापालिकेत यापुर्वी केली असल्यास त्यावरुन आतापर्यंत त्याने किती मँग्रोजची झाडे तोडलेली आहेत त्याचा अहवाल देण्यांत यावा, तसेच सदर जागेवर मोठया प्रमाणात भरणी करतेवेळी प्रदुषण विभागाने प्रदुषणाची मोजणी केलेली आहे कां?

प्रश्न क्रमांक ८ :

सन्मा.सदस्य श्री.राम पांडुरंग रेपाळे यांनी दि.०३.०८. २०१० रोजीच्या पत्रान्वये विचारलेले प्रश्न खालीलप्रमाणे,

१. कोरम संकुलातील बहुविध चित्रपटगृहींची निर्मिती व आराखडा यांची शासन आदेश क्रमांक ई.एन.टी.१०९९/प्र.क्र.७६/टी-१, दिनांक २०/०९/२००१ नुसार मंजूर झाला आहे कांय? सदर संकुलातील नाटयगृहातील रंगमंचाचे आकारमान किती आहे ? रंगमंचावर नाटयप्रायोग सादर करताना नाटयकलाकारांना आवश्यक असणा-या मेकअप रुम, प्रसाधन गृह, कपटे पट याकरीता किती आकारमानाच्या जागेची तरतुद केलेली आहे ? सदर संकुलामध्ये किती क्रमांकाचे चित्रपटगृह नाटयगृह म्हणून कायमस्वरुपी वापरात येत आहे ? सदर नाटयगृहात क्रायिंगरुम किती आकारमानाची आहे ? सदर संकुलात कला दालन, प्रदर्शन दालन व गेमींग झोन यांचे आकारमान शासन आदेशानुसार आहे कांय ? प्रत्येक दालनाचे आकारमान किती आहे ?

२. ज्ञानोदय विद्या मंदीर( हिंदी- प्राथमिक विभाग), स्वा.सावरकर नगर, ठाणे येथील प्राथमिक शिक्षक श्री.अखिलेश मिश्रा हे मनोरुग्ण आहेत कांय? सन २००१ ते सन २०१० पर्यंत त्यांनी १०२३½ दिवस एल.डब्ल्यु.पी. रजा घेतल्या आहेत कांय ? सन २००८-२००९ मध्ये ३०३½ दिवस व सन २००९-२०१० मध्ये २७६ दिवस मनोरुग्ण म्हणून उपचाराकरीता रजा घेणारा शिक्षक अध्यापनाकरीता सक्षम आहे कांय ? प्राथमिक विभागातील अल्पवयीन विद्यार्थ्यांच्या जिवितहानीची समस्या निर्माण झाल्यास शिक्षण मंडळ याची जबाबदारी घेणार आहे कांय ? शिक्षण मंडळाने या प्रकरणी मनोरुग्ण शिक्षकाची सेवा खंडीत कां केली नाही ?

<u>प्रश्न क्रमांक ९ :</u>

सन्मा.सदस्य श्री.जनार्दन कृष्णा खेतले यांनी दि.१०.०८. २०१० रोजीच्या पत्रान्वये विचारलेले प्रश्न खालीलप्रमाणे,

| | |
|---|---|
| १. | जानेवारी २००७ पासुन ठाणे महानगरपालिकेतील किती कर्मचारी व अधिका-यांना निलंबित करण्यांत आले ? |
| २. | सदरचे निलंबन कर्मचारी व अधिकारी यांना निलंबित काळात किती पगार देण्यांत येो व त्या सर्वांना महिन्याला किती रुपये दयावे लागतात? |
| ३. | माहितीच्या अधिकारानुसार विचारलेली माहिती किती दिवसांत देणे संबंधित अधिका-यांना बंधनकारक आहे, जर ती वेळेत देऊ शकले नाहीत तर त्यांच्यावर कोणती कार्यवाही होऊ शकते की कसे ? |
| ३. | मा.सर्वसाधारण सभेत सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे किती दिवसांत देणे बंधनकारक ाहे की कसे ? काही वेळा सदर प्रश्नांची उत्तरे पुढील मा.सर्वसाधारण सभेमध्ये देण्यांत येतील असे उत्तर मिळते तर ती माहिती पुढील सभेत देणे बंधनकारक आहे की कसे ? |
| ५. | मा.सर्वसाधारण सभेत पिठासिन अधिकारी म्हणून मा.महापौर यांनी संबंधित अधिका-यास दिलेला आदेश त्यांनी पाळला पाहिजे की कसे ? न पाळल्यास त्यावर कोणती कायदेशीर कारवाई होऊ शकते की कसे ? |

(सौ.छाया प्र. मानकर.)
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

महापालिका सचिव कार्यालय,
ठाणे महानगरपालिका,ठाणे
दिनांक १०.०८.२०१०.

## ठाणे महानगरपालिका,ठाणे

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक १०.०८.२०१०.

## ठाणे महानगरपालिकेच्या विशेष सर्वसाधारण सभेची सूचना,
## सभा सूचना क्रमांक ५, दिनांक १ ०.०८.२०१०.

प्रती,
सन्मा.श्री./श्रीमती..............................
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

या सूचनेव्दारे आपणास कळविण्यांत येते की,ठाणे महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा शनिवार दि.२१/०८/२०१० रोजी दुपारी ठिक ३.०० वाजता, ठाणे महानगरपालिकेच्या "भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहांत" सभा सूचना क्रमांक ५ दि.१०.०८.२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयावर विचारविनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत आली आहे.

तरी सदर सभेस आपण कृपया उपस्थित रहावे,ही विनंती.

मा.महापौर महोदय याचे मंजुरीने........

( सौ.छाया प्र.मानकर)
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

### सभा सूचना क्रमांक ५ , दिनांक १०.०८.२०१० ची विषयपत्रिका.

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| ११८. | ठाणे महानगरपालिका परिवहन सेवा व्यवस्थापन सुधारणेबाबत. |

(सौ.छाया प्र. मानकर.)
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

महापालिका सचिव कार्यालय,
ठाणे महानगरपालिका,ठाणे
दिनांक: १ ०.०८.२०१०.

ठाणे महानगरपालिका,ठाणे.

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक १३.०८.२०१०.

ठाणे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सूचना,
सभा सूचना क्रमांक ४, दिनांक १०.०८.२०१० बाबत पुरक घोषणा.

प्रती,
सन्मा.श्री./श्रीमती...............................
सदस्य/सदस्या,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

या सूचनेव्दारे आपणास कळविण्यांत येते की,ठाणे महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा शुक्रवार दि.२०/०८/२०१० रोजी सकाळी ठिक ११.३० वाजता, ठाणे महानगरपालिकेच्या "भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहांत " सभा सूचना क्रमांक ४ दि.१०.०८.२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचारविनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत आली आहे.

सदर सभेत खालील विषयांवर विचारविनिमय करण्यात येईल,अशी पुरक घोषणा याव्दारे करण्यांत येत आहे.

मा.महापौर महोदय याचे मंजुरीने........

( सौ.छाया प्र.मानकर)
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

सभा सूचना क्र.४ दि. १०.०८.२०१०बाबत पुरक विषयपत्रिका.

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| ११९ | ठाणे महानगरपालिकेच्या मा.महिला बालकल्याण समितीचे दि.८.२.२०१० रोजीच्या सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणेबाबत. |
| १२०. | श्री.एल.आर.गुप्ता-अतिरिक्त आयुक्त,ठाणे महानगरपालिका यांचे दि.२९.११.२००९ ते दि.३०.११.२०१० या कालावधीस मान्यता मिळणेबाबत तसेच दि.२९.११.२०१० नंतर पूढील एक वर्षाच्या मुदतवाढीस मान्यता मिळणेबाबत. |
| १२१. | ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वर्ग-१ व वर्ग-२ या संवर्गात सध्यस्थितीत रिक्त असलेली पदे व भविष्यांत वर्ग-१ व वर्ग-२ या संवर्गात निर्माण केलेली पदे सरळसेवेने भरणेची कार्यवाही महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत करुन घेणेबाबत. |

१२२. ठामपाच्या मुंब्रा प्रभाग समिती क्षेत्रातील आत्माराम पाटील चौक ते काळसेकर कॉलेज क्षेत्रातील नाल्यांचे बांधकाम करणेबाबत.

१२३. प्रभाग क्र.१८ मधील उन्नती गार्डनजवळील मोकळया आरक्षित मैदानावर मिनी स्टेडियम बांधणेबाबत येणा-या खर्चास मा.सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळणेबाबत.

१२४. महात्मा गांधी उद्यानाची ४००० चौ.फुट जागा लहान मुलांसाठी विजेवर चालणा-या खेळण्यांसाठी भाडयाने देण्यास मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत.

१२५. किसननगर नं.३ येथील आदिवासी गार्डनमधील संपकडे पाणीपुरवठा करणेसाठी २०० मि.मि.व्यासाची जलवाहिनी टाकणेबाबत येणा-या खर्चास मा.सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळणेबाबत.

१२६. ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील फेरीवाला व्यवसायाचे विनियमन आदर्श उपविधी २०१० प्रारुप उपविधीस मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत.

(सौ.छाया प्र. मानकर.)
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

महापालिका सचिव कार्यालय,
ठाणे महानगरपालिका,ठाणे
दिनांकः १३.०८.२०१०

ठाणे महानगरपालिका,ठाणे.
मा.सर्वसाधारण सभा
शुक्रवार दिनांक २०.०८.२०१०.
विषयपत्रिका

प्रति,
सन्मा.श्री/श्रीमती .........................,
सदस्य/सदस्या,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

अनुक्रमणिका

| अनुक्रमांक | तपशिल | पान क्रमांक | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत |
| १. | विषयपत्रिका | ०१ | ०३ |
| २. | सन्मा.सदस्यांच्या प्रश्नांची यादी | ०१ | ०६ |
| ३. | मा.सर्वसाधारण सभांचे इतिवृत्त | | |
| | दिनांक : २०.४.२०१० | १ | १२६ |
| | दिनांक : १८.६.२०१० | १ | ५३ |
| | दिनांक : २३.६.२०१० | १ | १०७ |
| | दिनांक : १६.७.२०१० | १ | ०८ |
| ४. | मा.महिला व बालकल्याण समितीचे इतिवृत्त<br>मा.क्रीडा समाजकल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समिती.<br>मा.आरोग्य परिरक्षण व वैद्यकिय सहाय्य समिती.<br>मा.गलिच्छ वस्ती निमुर्लन समिती<br>मा.माध्यमिक व पुर्वप्राथमिक शिक्षण समिती | १ | ०५ |
| ५. | प्रकरण क्रमांक /गोषवारा<br>प्रकरण क्र.१०० ते ११५ | | |

ठाणे महानगरपालिका,ठाणे.

महापालिका सचिव कार्यालय,

दिनांक : २०.०८.२०१०

ठाणे महानगरपलिकेच्या तहकूब सर्वसाधारण सभेचे परिपत्रक.

************

प्रति,

सन्मा.श्री./श्रीमती..........................,
सदस्य/सदस्या,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

या परिपत्रकाव्दारे आपणांस कळविण्यांत येत आहे की, ठाणे महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा शुक्रवार दिनांक २०.०८.२०१० रोजी सभा सूचना क्रमांक ०४ दि.१०.०८.२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवर विचारविनिमय करण्याकरीता आयोजित करण्यंात आली होती.

सदरची सभा तहकूब झाल्याने शुक्रवार दिनांक २७.०८.२०१० रोजी सकाळी ठिक सकाळी ११.३० वाजता, " भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहांत " आयोजित करण्यंात आलेली आहे. सदर सभेत सभा सूचना क्रमांक ०४, दिनांक १०.०८.२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवर विचारविनिमय करण्यंात येईल.

तरी कृपया सदर सभेस आपण कृपया उपस्थित रहावे,ही विनंती.

<u>मा.महापौर महोदय यांचे मंजुरीने.</u>

(सौ.छाया प्र. मानकर.)
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

महापालिका सचिव कार्यालय,
ठाणे महानगरपालिका,ठाणे
दिनांक: २०.०८.२०१०